३. नाट्य परिषदेतर्फे गरजू रंगकर्मींना वेळोवेळी आर्थिक मदत करण्यात येते. या वर्षी श्री. मंगेश कुलकर्णी आणि श्रीमती राजश्री निकम यांना प्रत्येकी रूपये पंचवीस हजार, श्री. वसंत इंगळे आणि श्री. गणेश जेठे यांना प्रत्येकी रूपये वीस हजार, श्रीमती शशिकला सुखदेव यांना रूपये पंधरा हजार आणि श्री. ललित खैनार, श्री. पुंडलिक सानप आणि श्री. रमेश राऊळ यांना प्रत्येकी रूपये दहा हजार इतकी आर्थिक मदत देण्यात आली.

## उल्लेखनीय कार्य

१. नाट्यपरिषदेच्या कार्यालयाचे संपूर्ण संगणकीकरण करण्याचे काम सुरू असून संपूर्ण सभासदांची यादी अद्ययावत करण्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले आहे. नाट्यपरिषदेच्या वेबसाईटचे काम लवकरच सुरू करण्यात येईल. भारतात जिथे नाट्यविषयक चळवळ आहे तिथे ती अधिक जोमाने सुरू व्हावी, त्याला चालना मिळावी, यासाठी तिथे नाट्य परिषदेच्या शाखा सुरू करण्याबाबतही प्रयत्न सुरू आहेत.

२. नॅशनल स्कुल ऑफ ड्रामाच्या संचालकपदी श्री. वामन केंद्रे यांची निवड करावी म्हणून अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेने प्रयत्न केले होते. त्याला यश येवून श्री. वामन केंद्रे यांची संचालकपदी नेमणूक झाली आहे. हे कळविण्यास आम्हांला आनंद होत आहे.

## यशवंत नाट्यमंदिर

आपल्या यशवंत नाट्य मंदिरास चांगल्याप्रकारे प्रतिसाद मिळत असून नाट्यगृहात होणाऱ्या कार्यक्रमात उत्तोरोत्तर वाढ होत आहे. वर्षभरात सहाशे अडुसष्ट कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात मराठी नाटके, इतर भाषिक कार्यक्रम शुटींग, सभा, संगीताचे कार्यक्रम यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक नामवंत व प्रसिद्ध व्यक्तींनी नाट्यगृहास भेट दिली.

## ९४ वे नाट्य संमेलन २०१३
## पंढरपूर

९४ व्या नाट्य संमेलनाच्या निमित्ताने रंगभूमीच्या अभिवृध्दिसाठी नाट्यलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेतील प्रथम क्रमांक रू. २१,०००/-, द्वितीय क्रमांक रू. ११,०००/-, तृतीय क्रमांक रू. ७,०००/-, व विशेष पुरस्कार म्हणून रू. ३,०००/- आणि उत्तेजनार्थ एकूण तीन पुरस्कार प्रत्येकी रू. १,०००/- अशी बक्षिसे देण्यात आली.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे '९४ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन' पंढरपूर शाखेच्या विद्यमाने 'पंढरपूर' येथे दि. १ फेब्रुवारी आणि दि. २ फेब्रुवारी २०१४ रोजी ज्येष्ठ रंगकर्मी मा. श्री. अरूण काकडे यांच्या अध्यतेखाली संपन्न झाले. या सोहळ्यात विविध करमणूकीचे कार्यक्रम सादर करण्यात आले. या सोहळ्याचा उद्घाटन समारंभ शनिवार, दिनांक १ फेब्रुवारी २०१४ रोजी सकाळी १०.०० वाजता आणि समारोप सोहळा रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०१४ रोजी सायं. ५.०० वा. संपन्न झाला.